मद्य निर्मितीसाठी काचेच्या बाटल्यांचा वापर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीपीए-१०१३/प्र.क्र.१६८/राउशु-२

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,

मंत्रालय,मुंबई-४०००३२.

दिनांक - ११ जानेवारी,२०१६.

<u>प्रस्तावना :</u>

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाअंतर्गत नियमातील तरतूदींनुसार भारतीय बनावटीचे विदेशी मद्य तसेच देशी मद्य निर्मिती करण्यास परवानगी देण्यात येते. देशी व विदेशी मद्य निर्मितीसाठी काचेच्या विविध प्रकारच्या आवेष्टनांचा वापर करण्यात येतो.

महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियमावली, १९६६ मधील नियम १७ (२८) मधील तरतूदींनुसार स्पिरीटस् निर्मितीसाठी फक्त नवीन आवेष्टने वापरणे बंधनकारक आहे. त्यामुळे विदेशी मद्य निर्मितीसाठी काचेच्या बाटल्यांसह पेट (PET) बाटल्यांचा तसेच टेट्रा पॅकचा वापर करण्यात येतो. देशी मद्य नियमावली, १९७३ मधील नियम ६ (२६) मधील तरतुदींनूसार देशी मद्य निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या बाटल्या आणि कंटेनर धुतलेले आणि स्वच्छ केलेले असणे आवश्यक आहे. त्यामुळे देशी मद्य निर्मितीसाठी काचेच्या, पेट (PET) बाटल्या तसेच जुन्या बाटल्यांचा वापर करण्यात येतो.

राज्यातील देशी व विदेशी मद्य निर्माण्यांना पेट (PET) व टेट्रा पॅक चा वापर करण्यास आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, यांचे स्तरावरुन परवानगी देण्यात आली आहे.

राज्यातील काही संघटनांकडून शासनाकडे वारंवार विनंती करण्यात येत आहे की, पेट बाटल्यांकरिता वापरण्यात येणारा पदार्थ हा पर्यावरणासाठी घातक आहे. कारण पेट बॉटल्स अविघटनशील असल्याने पर्यावरणाची हानी / प्रदुषण होण्याची शक्यता अधिक असते. पेट (PET) बॉटल्स वापरल्यानंतर त्याची विल्हेवाट सहजा-सहजी लावता येत नाही व गटारे-नाले, मलनि:सारण व्यवस्था इत्यादी मध्ये पडून राहील्याने सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. त्याचप्रमाणे प्लास्टीक हे अल्कोहोलमध्ये काही प्रमाणात विद्राव्य होत असल्याने मानवी आरोग्यास अपायकारक ठरू शकते. त्याचप्रमाणे PET बाटल्या वजनास हलक्या असल्याने व त्यांची वाहतुक करण्यास सोपे होते. चोरटया मार्गाने बाटल्याची ने-आण करताना अथवा वाहतुक करताना तस्करांना सोईचे होते व त्यामुळे शासनास महसूलास मुकावे लागते. दारुच्या अवैध तस्करीस आळा बसावा आणि PET बाटल्याचा वापर करणे हानीकारक आहे, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे देशी /विदेशी मद्याच्या काचेच्या बाटलीवर “ For Sale in Maharashtra State only ” असे शब्द इंग्रजीत आणि मराठीत "फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता" उमटविण्याचे (Emboss) बंधनकारक केल्यास मद्याच्या

तस्करीस आळा बसेल व त्यामुळे शासनाच्या महसूलात वाढ होऊ शकेल. या बाबी विचारात घेवून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियमावली १९६६ मधील नियम १७(२८) नुसार स्पिरीटस् साठी नवीन आणि महाराष्ट्र देशी मद्य नियमावली १९७३ मधील नियम ६(२६) च्या तरतुदीनूसार देशी मद्य निर्मितीसाठी स्वच्छ धुतलेल्या आवेष्टनांचा वापर करणे बंधनकारक आहे. या दोन्ही तरतुदी नुसार राज्यातील देशी/विदेशी मद्याच्या आवेष्टनांकरिता फक्त काचेच्या बाटल्या उपयोगात आणाव्या. तसेच या काचेच्या बाटलीवर इंग्रजीत “ For Sale in Maharashtra State only ” अथवा मराठीत "फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता" हे वाक्य प्रत्येक बाटलीवर उमटवलेले (Emboss) असावे. राज्यातील देशी/विदेशी मद्य बिअर, वाईन उत्पादना वेळी देशी/विदेशी मद्य वापराकरिता पेट (PET) व टेट्रा पॅकचा वापर करण्यास या शासन निर्णयाव्दारे निर्बंध घालण्यात येत आहेत. तसेच परराज्यातून आयात होणाऱ्या पेय मद्याबाबत देखील हे निर्बंध लागू राहतील. बिअरसाठी प्रचलित कॅनचा वापर करण्यास कोणतेही निर्बंध राहाणार नाहीत.त्याचप्रमाणे प्रचलित नियमातील तरतूदींनुसार स्पिरीटस्च्या निर्मितीसाठी फक्त नवीन काचेच्या बाटल्या वापरणे बंधनकारक राहील.

उपरोक्त बिअर, वाईन व देशी मद्य निर्माणी वापर करीत असलेल्या बाटल्या स्वच्छ करण्याची कार्यपध्दती भारतीय मानके प्रमाणकाने (Bureau of Indian Standard- BIS) विहित केलेल्या मानकानुसार अवलंबणे बंधनकारक राहील.

या शासन निर्णयाची अंमलबजावणी दि. १ एप्रिल,२०१६ पासून करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१११११३४५४४१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: CN = Punam Hiraman Wagde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Joint Secretary
Date: 2016.01.11 13:26:04 +05'30'

(पु.हि.वागदे)
सह सचिव,गृह विभाग

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२,
मा.मंत्री,राउशु यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२

मा.राज्यमंत्री,राउशु यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
प्रधान सचिव,राउशु , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,गो.ते. रुग्णालय,मुंबई
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१,
आयुक्त,अन्न व औषधे प्रशासन,वांद्रे (पू), मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय उपआयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
सर्व पीएलएल,सीएल-१ व बीआरएल अनुज्ञप्तीधारक,
निवड नस्ती.